ISSN 2231-1629
Knowledge Resonance
● Vol-9 No. 2 ● July-December 2020

# हुंडा एक सामाजिक समस्या, कारणे, परिणाम व उपाय

**प्रा. डॉ. राजेंद्र यादवराव बारसागडे**
समाजशास्त्र विभागप्रमुख
एफ.ई. एस. गर्ल्स कॉलेज, चंद्रपूर

**सारांश :**

21 व्या शतकातील मानवी समाजाचा विचार करता समाजात अनेक सामाजिक प्रश्न आहे. व त्यातीलच एक प्रश्न हा हुंडयाचा आहे. हुंडयाचा विचार करता हुंडयाचे प्रश्न आज कोणत्या एका समाजापुरता मर्यादित नाही. तर हुडंयाने प्रत्येक समाजात शिरकाव केलेला आहे. हुंडा ही एक सामाजिक प्रथा मानली जाते.लोक समाजातील सामाजिक प्रथेला सहजासहजी सोडत नसल्याने समाजात हुंडयामुळे विजोड विवाह,घटस्फोटाचे वाढते प्रमाण, कुमारीका व विवाहीत स्त्रीयांचे आत्महत्या, विवाहाचाभंग, कुटूंबाचे विघटन, स्त्रीभ्रुनहत्या या सारखे प्रश्न आज हुंडयामुळे निर्माण होत आहे. हुंडा समाजात घेण्यामागची कारणे मुलीचे वाढतेवय मुलीतील असलेले व्यंग, सामाजिक प्रतिष्टतेची भावना, योग्यवराची निवड, श्रीमंत कुटूंबाची अपेक्षा मुलीच्या नविन संसारास मदत या सारख्या कारणांमुळे हुंडा कायदा असताना सुध्दा घेतला जात आहे. समाजात अनेक सामाजिक प्रश्न उदभवत असल्याने समाजाचे आरोग्य बिघडत चाललेले आहे. समाजात आदर्श समजल्या जाना—या विवाहसंस्थेला आज गालबोट लागत आहे. हुंडा देणे,घेणे यावर त्वरीत आवर घातले नाही तर भविष्यात विवाह संस्थेवरील असलेला लोकांचा विश्वास उडेल व विवाह संस्थाच एक प्रकारे धोक्यात येइल यात मात्र शंका नाही.

मुख्य शब्द : हुंडा एक सामाजिक प्रथा, हुंडा एक सामाजिक समस्या, हुंडयामुळे समाजाचे आरोग्य बिगडत आहे . भविष्यात विवाहासंस्थेवर लोकांचा विश्वास राहनार नाही.

**प्रस्तावना**

समाजव्यवस्थेत वास्तव्य करताना समाजाचा एक सदस्य म्हणुन मानवास अनेक गरजांची पुर्तता करावी लागते. व मानवाच्या गरजा पुर्ण करण्या करीता समाजात अनेक सामाजिक संस्थाची निर्मिती सुध्दा झालेली असते. ज्यात प्रामुख्याने कुटूंबसस्था, विवाहसंस्था, धर्मसंस्था, राज्यसंस्था, अर्थसंस्था, शिक्षणसंस्था या सामाजिक संस्थाच्या माध्यमातुन मानवाच्या गरजाची पुर्तता सामाजिक नियमाच्या माध्यमातुन पुर्ण केली जाते. व्यक्ती समाजाचा एक अविभाज्य घटक आहे त्याच प्रमाणे तो एक कुटूंबाचा देखील सभासद असल्याने व्यक्तीला समाज नियमाच्या चौकोटीत राहुन जिवन जगावे लागते.समाजात सैराचारावर नियंत्रन ठेवण्या करीता व्यक्ती समाजाच्या नितीनियमाला व संस्कृतीला अनुसरून जीवन जगत असला तरी समाजात व्यक्तीला अनेक सामाजिक समस्याचा, सामाजिक प्रश्नाचा सामना पुरातनकाळापासुन आजच्या 21 व्या शतकातही तो समस्याचा सामना करीत आहे.वर्तमान काळाचा विचार करता समाजात विविध सामाजिक समस्या आहे. त्या विविध सामाजिक समस्यांपैकी एक समस्या म्हणुन हुंडा या समस्येचा विचार केला जातो. हुंडयाचा प्रश्न समाजातील एका व्यक्तीपुरता मर्यादित नाही किवा एका समाजापुरता ही मर्यादित नाही. तर समाजातील बहुसंख्य लोकाना हुंडयांच्या प्रश्नाचा सामना करावा लागत आहे. हुंडयांच्या प्रश्नाने समाजात अनेक सामाजिक प्रश्न निर्माण केले आहेत. वास्तविक पाहता 1 जुलै 1961 च्या हुंडा प्रतिबंध कायदयाने हुंडा देने, घेणे हा अपराध मानलेला आहे. तरी समाजात मुला मुलीच्या विवाह प्रसंगी हुंडा दिला जातो व घेतला जात आहे. हुंडयानवर प्रतिबंध लावता यावा या करीता 1961 च्या कायदयात बदल करून नव्याने 1984 हुंडा प्रतिबंध कायदा पारीत

करण्यात आलेला आहे. या कायदयाने मुला मुलीच्या विवाह प्रसंगी जो कोणी हुंडा मागेल व देणार अशा व्यक्तीस कमीत कमी दोन वर्ष शिक्षा व दहा हजार रूपये दंड देण्यात येते.तर 1986 च्या हुंडाप्रतिबंध कायदया नुसार हुंडयाबाबत गुन्हा करणा—या व्यक्तीला जमानत नाही व 5 वर्ष कारावास आणि 15 हजार रूपये दंड आहे.तरी पण कायदयाला न जुमानता वर्तमान समाजात हुंडा दिला जात आहे व घेतला जात असल्याने समाजात हुंडयामुळे हुंडाबळीच्या घटना सतत समाजात घडत आहे. तसेच हुंडयामुळे समाजात प्रौढकुमारीकेचा प्रश्न, आत्महत्या, कन्याहत्या, कर्जबाजारी, विवाहाचा भंग, घटस्फोट, विजोड विवाह या सारखे सामाजिक प्रश्न आज निर्माण झालेले आहे. 1990 मध्ये देशात 4148 हुंडाबळी, 1993 च्या भारत सरकारच्या अहवाला नुसार देशात एका दिवसात 33स्त्रीहत्या तर साध ाारनता एका वर्षात 5 हजार स्त्रियांची हत्या हे केवळ हुडंयामुळे होत आहे.

हुंडयाचा विचार करता हुंडयाचा प्रश्न वास्तविक पाहता नविन नाही प्राचीन काळात हुंडा ही एक प्रथा होती. परंतू 21 व्या शतकात हुंडा या प्रथेने उग्ररूप धारण केले असल्याने अनेक मुलीचा हुंडयामुळे विवाह होत नाही त्यामुळे मुलीचे आई,वडील चिंतेत असतात. हुंडाबळीच्या घटनेमूळे अनेक मुलीच्या वडीलाच्या काळजाचा थरकाप आज उडालेला आहे. एवढेच नाही तर कोणतेही वर्तमानपत्र घ्या त्या वृत्तपत्रात हुंडा या समस्येची बातमी हमखासपणे वाचायला मिळते. हुंडयाचा प्रश्न कमी होण्या ऐवजी त्यात वाढ होत असल्याने ज्या कुटूंबात विवाह योग्य मुली आहे अशा कुटूंबातील मुलीच्या आई वडिलाचे, भावाचे मन सतत विचारात गुतंलेले असतात. मुलीचे आई, वडिलाना व इतर सदस्यना मुलीच्या सुरूवातीस विवाहाची काळजी आणि विवाह नतंर तिच्या सासरकडील काळजी लागलेली असते. हुंडा या समस्ये बाबत वर्तमान समाजात भाषने दिली जातात, चित्रपटातुन हुंडया बाबतचे दृश्य दाखवली जातात, वर्तमानपत्रे व सभासमेलनाच्या माध्यमातुन समाजात हुंडा देणे घेणे कायदयाने गुन्हा आहे. याची माहिती देत असतात. परंतु या सर्व बाबींकडे आज दुर्लक्षकरूण मानव आपल्या माणुसकीला विकुन टाकलेला आहे. बरेचदा बोलले जाते की शिक्षणाने समाज विकसीत होतो परंतु आज शिकलेले लोकच अधिक प्रमाणात हुंडयाची मागनी करीत असतात म्हणजेच जशी पदवी तसा हुंडा असे समीकरण आज झालेले आहे.

**हुंडयाचा अर्थ :**

1961 च्या हुंडाप्रतिंबधक कायद्यानुसार हुंडा म्हणजे विवाहपूर्वी किवा विवाह नंतर विवाहातील कोणत्याही एका पक्षाने दुस—या पक्षास प्रत्यक्षरित्या किवा अपत्यक्षरित्या कबूल केलेली किवा दिलेली संपत्ती अथवा मौल्यवान वस्तू म्हणजे हुंडा होय. तर सर्व सामान्यता विवाहाच्या वेळी वरास पत्नीकडुन किवा पत्नीच्या(वधुच्या कुटूंबाकडूंन जी संपत्ती प्राप्त होते त्यास हुंडा असे म्हणतात किवा विवाह ठरविताना दोन्ही पक्षात झालेल्या बोलनी प्रमाने वधुपक्ष्याकडील व्यक्तीने वर पक्षाला दिलेले धन म्हणजे एक प्रकारे त्यास हुंडा असे म्हणतात

**हुंडा एक सामाजिक समस्या :**

हुंडयाचा विचार करता हुंडा ही एक प्राचीन प्रथा मानली जाते पुर्वी राजेमहाराजाच्या काळात विवाहाच्यावेळी व श्रीमंत कुटूंबात विवाह प्रसंगी मुलीना वस्तु, दागदागीने रूपये भेट म्हणुन देण्याची एक प्रथा होती. व ते एक श्रीमंतपणाचे लक्षण मानल्या जात होते व त्यामागे कारण सुध्दा होते. नवदाम्पंत्यास आपला संसार चालविण्यात त्या वस्तुची मदत व्हावी त्याना संसारात अडचन निर्माण होवू नये या करीता त्याना विवाह प्रसंगी पैसा व वस्तुभेट दिली जात होती. तसेच एम.एन.श्रीनिवास असे नमुद केले आहे की ब्रिटिशकाळात देखील हुंडा दिला जात होता. 1915 मध्ये कोलकता विद्यापीठातुन कायद्याची पदवी घेतलेल्या मुलास 10 हजार रूपये हुंडा दिला जायचा तर उच्च शिक्षण घेतलेल्या युवकास अधिक हुंडादिला जायचा तर 1926ते 1950 या काळात आपल्याला उच्चविद्याविभुषीत व चागंल्या पगाराची नोकरी असनारा जावई मिळावा या करीता समाजात अधिक हुंडा दिला जात होता. तर आज डॉक्टर, इजिनिअर, वकील, प्राध्यापक, प्रशासकिय अधिकारी असलेला जावई

आपल्याला मिळावा या करीता आज एकप्रकारे स्पर्धा चाललेली दिसते आहे तर शेतकरी, कामगार चपराशी व्यवसायीक, लिपीकपदावर कार्यकरणारे व्यक्ती देखील विवाह प्रसंगी हुंडा मागत आहे. तसेच विवाहाचा खर्च, वाहतुकीचा खर्च ये, जान करण्या करीता मागत असतात. हुंडयाचा विचार करता हुंडापुर्वी काही समाजील लोकानपुरता मर्यादित होता. आज हुंडयाने जवळपास अपवादात्मक काही जाती,घर्मगटातील व्यक्ती सोडल्यास वर्तमान समाजात हुंडयाची प्रथा सार्वत्रिक स्वरूपात दिसुन येते. हुंडा समाजातील विवाह प्रसंगी आवश्यक बाब मानली जावु लागलेली असल्याने हुंडयाच्या प्रथेने भारतीय समाजात अतिशय विकृत स्वरूप प्राप्त झालेले आहे. आदिवासी, ग्रामीन, शहरी मानवी समाजाचे अध्ययन केले असता काही निवडक जाती, धर्म गटातील व्यक्ती विवाह प्रसंगी वधु पक्षाकडुन हुंडा घेत नाही परंतू समाजातील अधिक प्रमाणात लोक विवाह प्रसंगी वधु पक्षाकडुंन हुंडा घेतात व मागत असतात. मुलीच्या वडीलाना वाटते की आपल्या मुलीचा सासरी छळ होवु नये, मानसिक त्रास देवु नये. हुंडयापाही मारझोड करू नये त्या करीता वर पक्षाच्या मागनी प्रमाणे नगद रोकड व दागदागीने हुंडयाच्या स्वरूपात मुलानकडील मडळीस देत असतात

हुंडयाचा विचार करता विवाहाच्या बैठकीत बोलल्या प्रमाणे मुलीच्या आईवडीलानी हुंडा दिला नसेल तर अशा प्रसंगी सासरकडील मंडळी मुलीना शारेरिक, मानसिक, छळ करतात मारझोड करतात काही कुटुंबातील मुलीने छळापोठी, मानसिक त्रासापोटी, मारजोडामुळे, उठता बसता आई वडीलाना शिवीगाळ केल्यामुळे अनेक नवविवाहीत स्त्रीयानी स्वताला संपवले आहे. तर काहीनी आपल्या जोडीदारा पासुन काडीमोड घेतलेला आहे. हुंडयाचा प्रश्न एका स्त्रीकरीता किवा एका समाजापुरता मर्यादित नाही. हुंडाबळीची आकडेवारी दरवर्षी वाढत असल्याने हुंडयाची समस्या भारतातील अनेक समस्या पैकी एक सामाजिक समस्या मानली जाते.

### हुंडा निर्मितीची कारणे

1. समाजात प्राचिनकाळा पासुन हुंडा या सामाजिक प्रथेचे अस्तित्व असल्याने आज समाजात हुंडयास एक रीत मानत असल्याने व्यक्ती समाजाच्या चालीरिती प्रमाणे वागत असतात व यातुनच मुला,मुलीच्या विवाह प्रंसगी हुडा दिला जातो व घेतला जात आहे.

2. आपण आपल्या मुलीच्या विवाह प्रसंगी वरपक्षाला अधिक हुंडा दिला की आपल्याला सामाजिक प्रतिष्ठा मिळेल या दृष्ठ प्रतिष्टतेच्या भावनेतुन अधिक प्रमाणात मुलीच्या विवाह प्रसंगी अधिक हुंडा देऊन मुलीचा विवाह करीत असतात यातुनच एकाला पाऊन एक हुंडा दिला जात आहे

3.समाजात बरेचदा व्यक्ती आपल्या मुलीचा विवाह प्रसंगी हुंडा देवुन विवाह करीत असतात आणि जेव्हा आपल्या मुलाचा विवाह करायचा असतो तेव्हा मात्र तो देखील हुंडा मागुनच विवाह करीत असतो परिणामता कुटूंबात एक प्रकारे दृष्ट भावना ठेवुन समाजात हुंडा मागितला जात असल्याने समाजात हुंडयाची प्रथा दिसुन येते

4.समाजात प्रत्येक मुलीच्या आईवडीलाना वाटत असते की आपल्या मुलीला योग्य वर मिळावा या उद्देशाने योग्य वराच्या शोधात असतात व योग्य वर मिळाल्यास व त्या मुलानी हूंडा मागितल्यास हुंडा देवुन मुलीचा विवाह करीत असतात या घटकामुळे देखील हुंडयाच्या प्रथेस चालना मिळते

5. मानवी समाजाचे एक महत्वाचे अंग म्हणुन जातीव्यवस्थेचा विचार केला जातो. जातीव्यवस्था बंद वर्ग असल्याने व जातीचे संस्कार व्यक्तीवर होत असल्याने व्यक्ती जाती नियमाच्या बाहेर जाण्यास तयार नसतात. जाती म्हणजेच काळ कितीही बदललेला असला तरी लोकांची मानसिकता बदललेली नाही त्या करीता मुला मुलीचा विवाह करायचा असेल तर केवळ आपल्या जातीगटातुनच मुला मुलीची निवड करीत असल्याने विवाहाचे क्षेत्र अशा प्रसंगी मर्यादित ठरत असते त्यामुळे मुलीचा

विवाह योग्य वयात होत नसल्याने मुलीचे वय वाढत जाते व वाढत्या वयाच्या मुलीन सोबत युवक विवाह करण्यास नकार देत असतात अशा प्रसंगी मुलीचा विवाह हुंडा देवुन केला जातो

6. अनकेदा मुलीत असलेले कुरूपपणा किवा व्यंगामुळे देखील मुलीचा विवाह होत नाही कुरुप असलेल्या मुलीस बरेच युवक नापसंती दर्शवितात परीणामता अशाप्रसंगी मुलीचा विवाह हुडा देवुन केला जातो.

7. प्रत्येक मुलीच्या आई वडीलाना वाटत असते की आपल्या मुलीला कोणत्याही प्रकारे ससांरात कोणत्या वस्तुची अडचन निर्माण होवु नये त्या करीता वस्तु स्वरूपात सामानखरेदी करून देतात परीनामता एक प्रकारे मुलींच्या नविन संसार उभारण्यास मदत व्हावी या उध्देशाने हुंडा दिला जातो या सारख्या कारणाने हुंडयाच्या प्रथेला चालना मिळते.

### हुंडयाचे समाजावर होणारे परिणाम

हुंडयाचा विचार करता समाजात व्यक्तीना अनेक प्रश्नाना तोंड दयावे लागत असते. ज्या मध्ये व्यक्ती समाजात प्रचलित असलेल्या हुंडयाची पुर्तता मुलीच्या विवाह प्रसंगी करू शकत नाही त्यामुळे मुलीचा विवाह होत नाही. हुंडयाच्या भितीमुळे काही कुटूंबात मुलीचा विवाह अल्पवयातच केला जातो. समाजात हुंडयामुळे मुलीचा विवाह योग्य वयात होत नसल्याने समाजात प्रौढ कुमारीकेचा प्रश्न निर्माण होतो. मुलीच्या विवाह प्रसंगी बैठकीत बोलल्या प्रमाणे मुलीचे वडील हुंडयाची पुर्तता वेळेवर न केल्याने त्याचा परिणम जोडलेल्या विवाहचा भंग होतो. काही कुटूंबात मुलीच्या विवाह करीता सावकारा कडुन कर्ज काढत असतात. परंतू कर्जाची परत फेड वेळेवर न करू शकल्याने व्याजाचा डोंगर वाढत जाते. व शेवटी व्यक्ती कर्ज बाजारी होतो. व नतंर कर्जापाही व्यक्ती आत्महत्या करतो. मुलीचा विवाह योग्य वयात न झाल्याने त्याचा परीनाम मुलीच्या मानसिकतेवर पडते व मनात अनेक विचार येतात त्यातुन घरचे बोलने याचा परीणाम शेवटी मुली सुध्दा आत्महत्या करतात. हुंडयामुळे मुलीचा विवाह लवकर करूण दिले जात असल्याने त्याच्या विकासात बाधा निर्माण होत असते. हुंडयामुंळे कुटूबांत स्त्रीयाना जाचक त्रास दिला जातो त्यामुळे जाचाला कटांळुन अनेक विवाहीत महिलानी स्वताला सपंविले आहे. कुटूंबात स्त्रीला नेहमी मारझोड व शिवीगाळ केली जाते तेव्हा जोडीदाराच्या त्रासाला कंटाळून घटस्फोट घेतला जाते. समाजात घटस्फोटाचे प्रमाण दिवसेन दिवस वाढत आहे. मुलीना शिक्षणा पासुन दुर ठेवले जाते. हुंडयाच्या भीती पोटी गर्भाशयातच मुलीची हत्या केली जाते. त्याचा परिणाम स्त्री पुरूषाच्या दरहजार संख्येच्या प्रमाणावर पडलेला आहे. हुंडयामुळे वर्तमान समाजात अनेक प्रश्न निर्माण होत असल्याने त्याचा परिणाम समाजावर पडते व समाजाचे आरोग्य बिघडते हया घटकाचा परिणाम भारतीय समाजात प्रचलित असलेली विवाह संस्थेवर पडल्याने विवाह संस्थाच एक प्रकारे भविष्यात घोक्यात येते की काय हा प्रश्न समाजापुढे पडलेला आहे.

### हुंडयाच्या समस्येवर उपाय

हुंडयाचे समाजावर घातक असे परिणाम पडत असल्याने यावर प्रतिबंधात्मक उपायकरणे समाजाच्या दृष्टिकोणातुन आवश्यक

असल्याने प्रथमता आपल्याच जातीगटात विवाह न करता आंतरजातीय विवाहास प्रोत्साहण दयावे जेणे करूण विवाहाचे क्षेत्र व्यापक ठरेल व जोडीदार निवडताना व्यक्तीस हुंडादयावा लागनार नाही. समाजात जो कोणी विवाहाच्या दरम्यान हुंडा मागेल अशा युवकाशी कोणत्याही युवतीने विवाह करू नये तसेच हुंडयाच्या बाबतीत पुरूष प्रधान मानसिकतेत बदल करणे, समाजात जो कोणी हुंडा मागेल तेव्हा समाजानी अशा कुटूंबावर बहिष्कार टाकने. हुंडा प्रतिबधक जे कायदे करण्यात आलेले आहे त्या कायदयात बदल करूण त्या पेक्षा अधिक कठोर नियम करावे जेने करूण हुंडा मागणा—या व घेणा—या व्यक्तीनवर जरब बसेल या दृष्टीने कायदा करण्यात यावा. तसेच हुंडयान विरोधी शाळा महाविद्याल याच्या माध्यमातुन समाजात जन जागृती करण्यात यावे. हुंडया विरोधी सेमीणार चर्चासत्र आयोजित करण्यात यावे जेने करूण लोकाना हुंडयाच्या परिणामाची जानीव होईल, हुंडया बाबत जे कायदे करण्यात आलेले आहे व त्या कायदयाच्या माध्यमातुन दिल्या जानाऱ्या शिक्षेची जानीव होइल व समाजात मग कोणी हुंडा मागणार नाही. तसेच हुंडया बाबत शिक्षण घेताना मुला मुलीनी प्रतिज्ञा घ्यावी की मी विवाह प्रसंगी हुंडा देनार व घेनार नाही मुलीनी हुंडामागनारया युवकाशी विवाह करणार नाही. तसेच हुंडया विरोधी समाजातच नाही देशात सामाजिक चळवळ निर्माण करावी. मुला मुलीना आपला जोडीदार निवडीचे स्वतंत्र कुटूंबानी दयावे, युवक युवतीना आर्थिक दृष्टया स्वावलंबी बनविने या सारख्या घटकाच्या माध्यमातुन काही प्रमाणात आपणास हुंडयाच्या समस्येवर मात करता येईल यात कोणतेही दुमत राहणार नाही.

### *संदर्भ*

1. *भारतीय समाज : प्रश्न आणि समस्या : प्रदिप आगलावे, श्री साईनाथ प्रकाशन, आवुर्ती जुलै 2009*
2. *भारतय समाज प्रश्न आणि समस्या : बी. एम. कऱ्हाडे, प्रकाशन पिपंळापुरे,नागपूर*
3. *भारतीय समाज आव्हाने आणि समस्या : रा.ज. लोटे, पिपंळापुरे. नागपूर. जुन 2009*